नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 20/02/2024 (मंगळवार) सकाळ

---

## जबरी संभोग करणाऱ्या आरोपीला कोर्टातुन शिक्षा

**पो.स्टे. काटोल** :– फिर्यादी यांच्या रिपोर्ट वरुन पो.स्टे. काटोल येथे अप क्र. ९९/१७ कलम ३७६(२) (एल), ४५२ भादवि सहकलम ६७ माहिती तंत्रज्ञान अधि. कायद्यान्वये गुन्हा नोंद झालेला होता.

दिनांक २३/०२/२०१७ चे १६/१५ वा. दरम्यान यातील आरोपी क्र. १) राजेश नरेश चव्हाण वय २३ वर्ष, रा. आलेसुर ता. कळमेश्वर जि. नागपूर याने फिर्यादीची चुलत बहिन पिडीत मतीमंद हिचा मतीमंद असल्याचा फायदा घेवुन पिडीता ही घरी एकटी असताना आरोपी क्र १ हा तिचे घरी जावुन बळजबरीने शारीरिक संबंध प्रस्थापित केले. व २) विधीसंघर्षित बालक याने सदर घटनेचे चित्रीकरण स्वतःचे मोबाईल मध्ये केले.

सदर प्रकरणाचे तपास पोनि डी. जे. चव्हान यांनी करून सदर प्रकरण न्याय प्रविष्ठाकरीता मा. जिल्हा न्यायाधीश कोर्ट क्र. ०३ ए. सी. राउत मॅडम कोर्टामध्ये सादर केले. आज दिनांक २०/०२/२०२४ रोजी मा. जिल्हा न्यायाधीश कोर्ट क्र. ०३ ए. सी. राउत मॅडम नागपूर यांनी वरील नमुद आरोपीला कलम ३७६ (२) (१)भादवि. मध्ये नमुद आरोपी क्र. ०१ यास २० वर्ष सश्रम कारावास व ५०००/– रू दंड. दंड न भरल्यास ०६ सश्रम महिने कारावास. कलम ४५२ भादंवि मध्ये ०२ वर्ष सश्रम कारावास व २०००/– रू दंड, दंड न भरल्यास ०३ महिने साधा कारावास अशी शिक्षा ठोठावली आहे. आरोपी क्र २ (विधीसंघर्षित बालक) विरूदध केस क्र २३५/१७ नुसार बालन्यायालय येथे केस सुरू आहे.

सरकारचे वतीने एपीपी साई खेडकर यांनी काम पाहीले. कोर्ट कामात पैरवी अंमलदार म्हणुन पोशि प्रमोद कोहळे पो.स्टे. काटोल यांनी मदत केली आहे.

**अवैध रेतीची चोरटी वाहतुक करणाऱ्या आरोपीतांविरूद्ध गुन्हा नोंद**

**वाहनासह एकुण २०,३०,०००/— रूपयाचा मुद्देमाल जप्त**

**नागपूर ग्रामीण विशेष पथकाची कारवाई**

दिनांक १८/०२/२०२४ चे २२.५० वा. ते २३.१५ वा. दरम्यान मा. पोलीस अधिक्षक यांचे विशेष पथकातील स्टाफ पोस्टे हद्दीत पेट्रोलिंग करीत असताना गोपनीय सूत्रधाराकडून माहीती मिळाली की १० चक्का टिप्पर गाडी मध्ये अवैदयरित्या विनापरवाना रेती लोड करुन भंडारा कडुन रामटेक मार्गे नागपुर कडे वाहुतक करीत आहे. अशा खात्रीशीर बातमी वरून मौजा रामटेक शितलवाडी येथे नाकाबंदी करीत असताना एक अवैध रेती वाहतुक संबधाने टिप्पर वाहन क्र. एम. एच— ४०/ बि एल— १६६९ येतांना दिसले. स्टाफने वाहनांना थांबवून पाहणी केली असता वाहनामध्ये अंदाजे ०४ ब्रास रेती ब्रास रेती मिळून आल्याने सदर टिप्पर चालकास टिप्पर मधील रेतीचे रॉयल्टी बाबत विचारले असता रॉयल्टी नसल्याचे सांगितल्याने व सदरची रेती ही चोरीची असल्याची खात्री झाल्याने आरोपींच्या ताब्यातून टिप्पर क्र. एम एच.— ४०/बि एल— १६६९ किंमती २०,००,०००/— रू. ज्यामध्ये ०४ ब्रास रेती प्रत्येकि किंमत ५०००/—रु एकुण किमत २०,०००/— रु., वाहन चालकाचा जुना वापरता मोबाईल ओपो कंपनीचा किंमती १०,०००/—रु. असा एकुण २०,३०,०००/— रूपयाचा मुद्देमाल जप्त करून आरोपी नामे—०१) नंदकुमार रमेश जांभोरे वय ३३ वर्ष, रा. हनुमान मंदिर जवळ जमुनापार साकोली भंडारा (एम एच ४० बि १६६९ चा चालक) याने ०२) फरार सुमित हरगोंविद लांजे वय ३० वर्ष, रा. सेंदुरवाफा त. साकोली जि. भंडारा (एम एच ४० बि १६६९ चा मालक ) यांचे सांगणे प्रमाणे विनापरवाना रेती चोरी करून वाहतूक करताना मिळून आले. असे एकुण ०२ आरोपी यांचेविरुद्ध पोस्टे रामटेक येथे अप क्र. ११७/२४ कलम ३७९, १०९, ३४ भादंवि. सहकलम ४८(७), ४८(८) महाराष्ट्र जमिन महसूल संहिता, सहकलम ४, २१ खाण, खनिज अधि. ३ सार्वजनिक मालमत्ता दस्तऐवज अन्वये पो. स्टे. रामटेक येथे गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे.

सदरची कार्यवाही ही मा. पोलीस अधीक्षक नागपूर ग्रामीण हर्ष ए. पोद्दार (भापोसे), मा. अपर पोलीस अधीक्षक रमेश धुमाळ यांचे मार्गदर्शनाखाली सहायक पोलीस निरीक्षक श्री. अमित पांडे, पोलीस हवालदार ललीत उईके, पोलीस नायक प्रणय बनाफर, पोलीस अंमलदार कार्तिक पुरी, बालाजी बारगुले, शुभम मोरोकार विशेष पथक नागपूर ग्रामीण यांनी केली.

**पोलीस माहिती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**